क्रमांक : २७९६४/ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७.

**प्रेषक :**

**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याबाबत.**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजीपासून विधान भवन, नागपूर** येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता बॅलटमध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमुद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वितरित करण्यात येत आहे (प्रत सोबत जोडली आहे).**

**मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली विधान परिषदेचे मा.नेते, गटनेते व प्रतोद यांच्यासमवेत "तारांकित प्रश्नांच्या बॅलटसंदर्भात" बुधवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत पूर्वीच्या (माजी विधानपरिषद सदस्य श्री.बी.टी. देशमुख यांनी सुचविलेल्या) बॅलट पध्दतीप्रमाणे तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट घेण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. उक्त बॅलट पध्दतीमध्ये अल्प स्वरुपात सुधारणा करण्याचाही निर्णय करण्यात येऊन त्याबाबतचे प्रात्यक्षिक मंगळवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी घेण्याचे ठरविण्यात आले.**

त्यानुसार **पहिल्या टप्प्यातील** तारांकित प्रश्न सूचना **सोमवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७** रोजी **Online पध्दतीद्वारे** मा.सभापती यांच्या आदेशानुसार **प्रत्येकी ३१ याप्रमाणे तारांकित प्रश्न सूचना सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत संगणक आज्ञावलीद्वारे स्वीकारण्यात येतील.**

सदर दिवशी स्वीकारण्यात यावयाच्या प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत झालेल्या प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई** येथे घेण्यात येईल. सदरहू बॅलट प्रसंगी उपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट पाच फे-यांमध्ये (१+२+३+५+उर्वरित) घेण्यात येईल व सदर बॅलटसाठी प्रश्न सूचना दिलेल्या मा.सदस्यांपैकी अनुपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट अशाच प्रकारे पाच फेऱ्यांमध्ये तद्नंतर घेण्यात येईल. **सदर बॅलटकरिता अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांचे, त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींकडून किंवा अन्य सदस्यांकडून प्राधिकारपत्र (Authority Letter) न स्वीकारण्याचा निर्णयही उक्त बैठकीत झालेला आहे.**

..२/-

**तसेच संसदीय कार्य विभागाने दोन आठवडयांचा म्हणजेच सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ ते शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एका आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दाखविण्यात येत आहे.**

सोमवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्राप्त झालेल्या प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबतचा तपशील **मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७** रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात येईल.

**तसेच शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ पासून दुसऱ्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचना Online पध्दतीद्वारे सकाळी ११.०० वाजल्यापासून स्वीकारण्यात येतील. सदर प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न, मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी होणाऱ्या बॅलटच्या प्रश्नानंतर, त्या प्रश्नांच्या अनुक्रमांकानुसार तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**(ज.बा.राणे)**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,**
**विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.**

## महाराष्ट्र विधानपरिषद

क्रमांक : १०३

पत्रक भाग दोन

गुरुवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७/ अश्विन २०, १९३७ (शके)

### महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१७ मधील चौथे (हिवाळी) अधिवेशनातील (माहे डिसेंबर, २०१७) तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम

१३३ महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१७ मधील चौथे (हिवाळी) अधिवेशन **(माहे डिसेंबर, २०१७)** कालावधीकरिता माननीय मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ व ४)**

**सोमवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी स्वीकारण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे मा.सदस्यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी उपस्थित राहणाऱ्या मा.सदस्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता मिळणार नाही. तसेच शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी पासून स्वीकारण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी होणाऱ्या बॅलटसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नानंतर अनुक्रमे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

**विधानपरिषद तारांकित प्रश्न सूचना स्वीकारणे व त्यावरील कार्यवाही करण्यासाठी QIS या संगणकीय प्रणालीचा वापर होत असून मा.सदस्यांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रश्न सूचना स्वीकारण्यात येत आहेत. आगामी हिवाळी अधिवेशनासाठी ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील.**

..२/-

# विवरणपत्र

| गट क्रमांक (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) वित्त व नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री<br>(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री<br>(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७<br>सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ | शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ |
| दोन | (१)महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२)कृषी, फलोत्पादन मंत्री<br>(३)परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(४)सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५)पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य विकास मंत्री | मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१७<br>मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७<br>*मंगळवार, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ | शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७<br>शनिवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१७<br>शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) गृहनिर्माण मंत्री<br>(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१७<br>बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७<br>*बुधवार, दिनांक २७ डिसेंबर, २०१७ | शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७<br>शनिवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१७<br>शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ |
| चार | (१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण,मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७<br>गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७<br>*गुरुवार, दिनांक २८ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७<br>सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१७<br>सोमवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ |
| पाच | (१) आदिवासी विकास मंत्री<br>(२) उद्योग व खनिकर्म मंत्री<br>(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री<br>(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री | शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७<br>शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७<br>*शुक्रवार, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ | मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७<br>मंगळवार, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७<br>मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ ते शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवडयाच्या प्रश्नसूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७

डॉ.अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रति,

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
(४) संगणक कक्ष/MKCL कक्ष

C: Users e1 Desktop NAGPUR 2017 (2) Rotation bull part 2 new.doc

### मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

(१) **श्री. देवेंद्र फडणवीस ---- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग
(२) नगरविकास विभाग
(३) गृह विभाग
(४) विधी व न्याय विभाग
(५) बंदरे विभाग
(६) माहिती व जनसंपर्क आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय

(२) **श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील --- महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (महसूल आणि मदत व पुनर्वसन विषयक बाबी)
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(३) **श्री. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार --- वित्त व नियोजन, वने मंत्री**

(१) वित्त विभाग
(२) नियोजन विभाग
(३) महसूल व वन विभाग (वने विषयक बाबी)

(४) **श्री. विनोद श्रीधर तावडे --- शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(३) मराठी भाषा विभाग
(४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)
(५) अल्पसंख्याक विकास विभाग (अल्पसंख्याक विकास व वक्फ विषयक बाबी)

(५) **श्री. प्रकाश मंचूभाई महेता --- गृहनिर्माण मंत्री**

गृहनिर्माण विभाग

(६) **श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे --- ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री**

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास विषयक बाबी)
(२) महिला व बाल विकास विभाग

(७) **श्री. विष्णु रामा सवरा --- आदिवासी विकास मंत्री**

आदिवासी विकास विभाग

(८) **श्री. गिरीश भालचंद्र बापट --- अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**

(१) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)
(३) संसदीय कार्य विभाग

(९) **श्री. गिरीष दत्तात्रय महाजन ---- वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग

**(१०) श्री. दिवाकर नारायण रावते --- परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
(१) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)
(२) जलसंपदा विभाग (खारभूमी विकास विषयक बाबी)

**(११) श्री. सुभाष राजाराम देसाई --- उद्योग, खनिकर्म मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग व खनिकर्म विषयक बाबी)

**(१२) श्री.पांडुरंग पुंडलिक फुंडकर --- कृषी, फलोत्पादन मंत्री**
कृषी आणि फलोत्पादन विभाग

**(१३) श्री. रामदास गंगाराम कदम --- पर्यावरण मंत्री**
पर्यावरण विभाग

**(१४) श्री. एकनाथ संभाजी शिंदे --- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)

**(१५) श्री. चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे --- ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)
(२) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

**(१६) श्री. बबनराव दत्ताराव लोणीकर --- पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

**(१७) डॉ. दीपक रामचंद्र सावंत --- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण विभाग

**(१८) श्री. राजकुमार सुदाम बडोले --- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**(१९) प्रा.राम शंकर शिंदे --- जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण विषयक बाबी)
(२) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)
(३) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

**(२०) श्री.जयकुमार जितेंद्रसिंह रावल --- रोजगार हमी, पर्यटन मंत्री**
(१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(२) पर्यटन विभाग

**(२१) श्री.सुभाष सुरेशचंद्र देशमुख --- सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**(२२) श्री.महादेव जगन्नाथ जानकर --- पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**
पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभाग

**(२३) श्री.संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर --- कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)
(२) महसूल व वन विभाग (भूकंप पुनर्वसन विषयक बाबी)
(३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
(४) सामान्य प्रशासन विभाग (माजी सैनिकांचे कल्याण विषयक बाबी)

---------------